**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**शुक्रवार दिनांक १३ मार्च २०२६**

**ठळक बातम्या**

1. **स्वयंपाकाचा गॅस आणि इतर पेट्रोलियम उत्पादनांचा काटकसरीने वापर करावा असं केंद्रीय पेट्रोलियम मंत्रालयाचं आवाहन.**
2. **नागपूर महानगरपालिकेचा सुमारे 315 कोटी रुपये शिलकीचा सुधारित अर्थसंकल्प सादर.**
3. **बेकायदेशीर धर्मांतराला प्रतिबंध करणारं महाराष्ट्र धर्मस्वातंत्र्य विधेयक २०२६ विधानसभेत सादर.**
4. **गुडघे आणि सांधेदुखीच्या शस्त्रक्रियेसाठी मॉईल आणि इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर यांच्यात सामंजस्य करार.**

---------------------------------------------

स्वयंपाकाचा गॅस

पश्चिम आशियातल्या संघर्षग्रस्त परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर, पेट्रोलियम उत्पादनांची संभाव्य टंचाई लक्षात घेता, नागरिकांनी स्वयंपाकाचा गॅस आणि इतर पेट्रोलियम उत्पादनांचा काटकसरीने वापर करावा असं आवाहन पेट्रोलियम आणि नैसर्गिक गॅस मंत्रालयानं केलं आहे. याबाबत जारी केलेल्या अधिसूचनेनुसार, देशात सध्या स्वयंपाकाचा गॅस, पेट्रोल आणि डिझेलचा पुरेसा साठा असून, पुरेसा राखीव साठा उपलब्ध आहे. राज्यात घरगुती एलपीजी गॅस सिलिंडरच्या पुरवठ्यात अडथळे निर्माण होऊ नयेत, आणि संभाव्य टंचाईच्या परिस्थितीत समन्वय साधता यावा, यासाठी राज्य शासनानं जिल्हास्तरावर विशेष समित्या स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. राज्यात एलपीजी पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी तसंच त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्याचे निर्देश अन्न आणि नागरी पुरवठा विभागाचे अपर मुख्य सचिव अनिल डिग्गीकर यांनी संबंधित यंत्रणांना दिले आहेत. रुग्णालयं, शासकीय वसतिगृहं, शासकीय शाळा-महाविद्यालयांमधल्या खानावळी, मध्यान्ह भोजन योजना, शासकीय आश्रमशाळा आदी अत्यावश्यक सेवा देणाऱ्या संस्थांना गॅसचा प्राधान्यानं पुरवठा करण्यात येणार असून, अशा संस्थांची यादी प्रसिद्ध करणार असल्याचं राज्य शासनानं म्हटलं आहे.

---------------------------------------------

मनपा अर्थसंकल्प

नागपूर महानगरपालिकेचा एकूण 5 हजार 401 कोटी जमा आणि 5 हजार 85 कोटी खर्च यासह 315 कोटी शिलकीचा सुधारित अर्थसंकल्प महानगरपालिका आयुक्त डॉ. विपीन इटनकर यांनी स्थायी समिती सभापती शिवानी दाणी यांना सादर केला. यावेळी डॉक्टर इटनकर यांनी नागनदी प्रदूषण निर्मूलन विभागाअंतर्गत मनपाचा हिस्सा उभारण्याकरिता 2026 -27 या आर्थिक वर्षात 200 कोटी रुपयाचे कर्जरोखे अर्थात म्युनिसिपल बॉन्ड उभारण्याचा मनपाचा मानस असल्याचं सांगितलं, त्याचप्रमाणे सद्यस्थितीत या अर्थसंकल्पात कुठलीही करवाढ प्रस्तावित नसल्याचं त्यांनी सांगितलं. राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत क्वेटा कॉलनी येथील देवाडिया हॉस्पिटलचे पाच मजल्याचे बांधकाम पूर्ण झाले असून उर्वरित बांधकाम प्रगतीपथावर असल्याची माहिती त्यांनी दिली. शहरातील उद्यानांचे थीम बेस्ड उद्यान अंतर्गत सौंदर्यीकरण करून सुमारे 90 कोटी रुपये उद्यान विभागासाठी प्रस्तावित केले असल्याचंही ते म्हणाले. नागपूर महानगरपालिकेच्या स्थायी समितीच्या अध्यक्षा शिवानी दानी यांनी महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पाबाबत प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. या अर्थसंकल्पात महानगरपालिकेच्या महसुली उत्पन्नात वाढ होण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला असून, शहरातील विविध विकासकामांना प्राधान्य देण्यात आल्याच त्यांनी यावेळी स्पष्ट केल. शिक्षणावर विशषत्वाने भर देण्यात आला आहे असं सांगताना त्या म्हणाल्या

(***होल्ड बाईट - शिवानी दाणी***)

हा अर्थसंकल्प केवळ आकड्यांपुरता मर्यादित न राहता नागरिकाभिमुख आणि विकासाभिमुख असावा, यासाठी प्रशासन आणि स्थायी समितीचे सदस्य प्रयत्नशील असल्याचं शिवानी दाणी यांनी यावेळी स्पष्ट केलं.

---------------------------------------------

गॅस सिलेंडर तुटवडा

दरम्यान नागपुर शहरात व्यावसायिक तसेच घरगुती गॅस सिलेंडरचा कोणताही तुटवडा नाही, त्यामुळे नागरिकांनी घाबरण्याचं कोणतही कारण नसल्याचं आयुक्त डॉ विपीन यांनी यावेळी पत्रकारपरिषदेत स्पष्ट केलं. नागरिकांनी शक्यतोवर गॅस सिलेंडरसाठी ऑनलाईन बुकिंग करण्यास प्राधान्य द्याव, अस आवाहन त्यांनी केल....... (***होल्ड बाईट - डॉ विपीन - ४३ सेकंद***)

---------------------------------------------

धर्मस्वातंत्र्य विधेयक

महाराष्ट्र धर्मस्वातंत्र्य विधेयक २०२६ आज विधानसभेत मांडण्यात आलं. गृहराज्यमंत्री पंकज भोयर यांनी हे विधेयक सभागृहात मांडलं. धर्मस्वातंत्र्याचं रक्षण करणं, एका धर्मातून दुसऱ्या धर्मात बेकायदेशीर धर्मांतराला प्रतिबंध करणं हे याचं उद्दिष्ट आहे. आमिष दाखवून, जबरदस्ती, फसवणूक करून, दिशाभूल करून केलेल्या वैयक्तिक किंवा सामुहिक धर्मांतराला या विधेयकाला विरोध करणं हा याचा हेतू आहे. धर्मांतर घडवून आणणाऱ्या व्यक्तीला सात वर्षांच्या कारावासाची शिक्षा आणि एक लाख रुपये दंड या शिक्षेची यात तरतूद आहे.

---------------------------------------------

विधिमंडळ

पूर्वप्राथमिक शाळेत प्रवेशासाठी प्रवेश परीक्षा घेऊ नये यासाठी सरकार नियम करणार असून खासगी बालवाड्यांच्या नोंदणीसाठी एक अधिनियम प्रस्तावित असल्याचं शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी आज विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात सांगितलं. या अधिनियमाचा उद्देश नोंदणी, नियमन आणि गुणवत्ता सुनिश्चित करणं हा असून आगामी शैक्षणिक वर्ष सुरु होण्याआधी हा अधिनियम लागू केला जाईल, असं भुसे यांनी सांगितलं. या अधिनियमा अंतर्गत बालवाड्यांच्या नोंदणीसाठी सक्षम प्राधिकरणाची नेमणूक केली जाणार आहे. तसंच २० विद्यार्थ्यांसाठी एक शिक्षक असावा असा नियम लागू केला जाणार आहे. राज्यात १२ हजार ७३३ पूर्वप्राथमिक खासगी शाळा नोंदणीकृत आहेत, इतर शाळांनीही नोंदणी करावी असं आवाहन भुसे यांनी केलं. शिक्षण हक्क कायद्याअंतर्गत घरापासून १ किलोमीटर अंतरापर्यंतच्या शाळेत प्रवेश दिला जातो, गरज असेल तर हे अंतर ३ किलोमीटरपर्यंत वाढवण्याचा विचार केला जाईल असं शिक्षणमंत्र्यांनी सांगितलं. सर्व शिक्षण मंडळांच्या आणि माध्यमांच्या शाळांमध्ये मराठी भाषा अनिवार्य असून ज्या शाळेत मराठी शिकवली जात नाही त्या संस्थेची मान्यता रद्द केली जाईल, असंही त्यांनी सांगितलं. मनिषा चौधरी, प्रवीण दटके, विक्रम पाचपुते, अमित देशमुख यांनी याबाबत प्रश्न विचारला होता. ऐकुया आजच्या विधिमंडळ कामकाजाचा आढावा आमच्या प्रतिनिधीकडून........

***(व्हॉइस कास्ट - हेमांगी)***

***अतिवृष्टीग्रस्त भागातल्या विद्यार्थ्यांसाठी परीक्षा शुल्क माफीचा निर्णय सरकारनं घेतला आहे, मात्र ऑनलाईन फॉर्म भरताना परीक्षा शुल्क भरणं अनिवार्य असल्याचं कैलास पाटील यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिलं. यावर तांत्रिक अडचण दूर***

*करायचा प्रयत्न केला जाईल, असं उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी सांगितलं. अतिवृष्टी ग्रस्त भागातल्या विद्यार्थ्यांना ५० टक्के आणि विद्यार्थिनींना पूर्ण शुल्क माफ केलं असून जे कुणी शुल्क घेत असेल त्याच्यावर कारवाई केली जाईल असं आश्वासन पाटील यांनी दिलं. विधानसभेत अर्थसंकल्पावरच्या अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा सुरू असताना संबंधित विभागाचा एकही सचिव सभागृहात उपस्थित नसल्यामुळे कामकाज काही काळ स्थगित करावं लागलं. या अनुपस्थितीबद्दल सत्ताधारी आणि विरोधी पक्षाच्या सदस्यांनी तीव्र आक्षेप नोंदवला. शिक्षण शुल्कात सवलत देणाऱ्या योजनेअंतर्गत विद्यार्थिनींना प्रवेश नाकारणाऱ्या राज्यातल्या महाविद्यालयांविरोधात कारवाई केली जाईल असं उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी आज विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासादरम्यान सांगितलं. उच्च शिक्षणात महिलांचा सहभाग वाढवण्यासाठी, व्यावसायिक अभ्यासक्रमाला प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थिनींना शिक्षण शुल्क माफ करण्याचा निर्णय दोन वर्षांपूर्वी घेण्यात आल्याचं ते म्हणाले. सामाजिक न्याय विभागामार्फत सावित्रीबाई फुले शिष्यवृत्तीअंतर्गत अनुसूचित जातीच्या शालेय विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या शिष्यवृत्तीच्या रकमेत वाढ करायचा निर्णय अधिवेशन काळात घेऊ, या वर्षापासून ही वाढीव शिष्यवृत्ती लागू होईल, असं आश्वासन सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट यांनी आज विधानपरिषदेत दिलं.*

---------------------------------------------

सामंजस्य करार

राज्यात ४० वर्षांपेक्षा अधिक वयाच्या सुमारे ४ कोटी नागरिकांपैकी सुमारे ४० लाख नागरिक संधीवात, गुडघेदुखी आणि सांधेदुखीच्या समस्यांनी ग्रस्त असून त्यापैकी सुमारे १० लाख नागरिकांना सांधेबदल शस्त्रक्रियेची गरज आहे. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने मॉईल आणि इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालय, नागपूर यांच्यात महत्वपूर्ण सामंजस्य करार करण्यात आला आहे. या करारानुसार नागपूर आणि भंडारा जिल्ह्यातील खाणींच्या १० किलोमीटर परिसरातील तसेच ग्रामीण भागातील गरजू रुग्णांना सांधेरोपण शस्त्रक्रिया विनामूल्य करण्यात येणार आहे, अशी माहिती अधिष्ठाता डॉ. रवी चव्हाण यांनी दिली. महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य योजना तसेच प्रधानमंत्री जनआरोग्य योजनेत समाविष्ट न होणाऱ्या रुग्णांनाही या कराराचा लाभ मिळणार आहे. नागपूर जिल्ह्यात मॉईलच्या चार तर भंडारा जिल्ह्यात दोन खाणी

असून त्या परिसरातील आदिवासी आणि गरजू नागरिकांपर्यंत पोहोचण्यासाठी वैद्यकीय तपासणी शिबिरे आयोजित करण्यात येणार आहेत.

----------------------------------------------

हवामान

नागपुरात आज ३९ अंश सेल्सिअस इतक्या तापमानाची नोंद करण्यात आली. विदर्भात अकोला, अमरावती, वर्धा, यवतमाळ आणि चंद्रपूर या जिल्ह्यांमध्ये उष्णतेच्या लाटेचा यलो अलर्ट देण्यात आला आहे. त्यानुसार मागील २४ तासांत अकोला इथं 42 अंश सेल्सिअस, तर अमरावती इथं 42.2 सेल्सिअस इतक्या कमाल तापमानाची नोंद करण्यात आली. येत्या १७ ते २० मार्च दरम्यान राज्यातल्या काही भागांमध्ये प्रामुख्याने दुपारनंतर आभाळी हवामान तयार होऊन मेघगर्जनेसह पाऊस आणि वादळी वाऱ्यांची स्थिती निर्माण होण्याचा प्राथमिक अंदाज आहे. सध्याच्या अंदाजानुसार ही स्थिती प्रामुख्याने विदर्भ, मराठवाडा, खान्देश तसंच मध्य महाराष्ट्रातल्या भागांमध्ये दिसून येऊ शकते. त्यामुळे शेतकऱ्यांनी पुढील काही दिवस हवामानाच्या अद्ययावत अंदाजाकडे लक्ष ठेऊन, त्यानुसार शेतीची कामं करावीत, काढणी केलेली पिकं सुरक्षित ठिकाणी साठवून ठेवावी, असं आवाहन कृषी विभागानं केलं आहे.

----------------------------------------------